**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

**“मायबोली”**

| | |
|---|---|
| **Name of the Event -:** | **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा<br>“मायबोली”** |
| **Date & Time of the Program-:** | २८ जानेवारी २०२१ |
| **Venue -:** | Google Meet |
| **No of Participants-:** | 54 |
| **Objective-:** | • विधार्थी आणि सामाज्यामध्ये मराठी भाषेच महत्व पटवणे व टिकवणे.<br>• मराठी भाषेचा वापर दैनंदिन जीवनात करणे |
| **Brief Report of the Program-:** | महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाद्वारे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा राबवणे सांगण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही देखील दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी महाविद्यलयीन स्थरावर विविध कार्यक्रम घायचे ठरवले. त्या अनुशंघाने आमच्या महाविद्यालयाच्या मराठी भाषा समितीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. कोविड काळात महाविद्यालयात कार्यक्रम साजरा करणे शक्य नसल्याने प्राचार्यांच्या सहमतीने आम्ही ऑनलाईन कार्यक्रम घ्यायचे ठरवले आणि मुलांना लेक्चर दरम्यान कार्यक्रमा बद्दल सांगण्यात आले. समितीने खालील प्रमाणे कार्यक्रम घ्याचे ठरवले आणि सदारकर्त्या मुलांची नावे लेक्चरच्या वेळी घेण्यात आली.<br>१. गायन<br>२. कविता वाचन<br>३. नृत्य<br>२८ जानेवारी २०२१ ला सायंकाळी ६-७ दरम्यान "मायबोली " हा कार्यक्रम गुगल मीट या माध्यमा द्वारे घेण्यात आला. कार्यक्रमासाठी एकूण ५४ विधतार्थी ऑनलाईन हजर होते. कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेच महत्व आणि संवर्धन करण्याची का गरज आहे हे प्रा. तुषार पवार यांनी त्यांच्या प्रस्थावने द्वारे मुलांना सांगितले. मराठी गीत गाऊन त्यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापक मंडळींचे स्वागत केले. त्या नंतर प्राचार्य डॉ. एकनाथ झरेकर सर यांनी देखील मुलांचे स्वागत करून मराठी भाषा संवर्धना विषयी संबोधन केले आणि कार्यक्रमासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.<br>त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात मराठी कविता वाचनाने झाली. महाविद्यालयाचे विध्यार्थी १. भावीण जानी आणि २, अक्षय चव्हाण यांनी कविता सादर केल्या. तदनंतर कुमारी दिव्या ठाकूर हिने मराठी गाणे गायिले. दिव्याच्या गाण्याची मुलांनी फार स्तुती केली आणि गाण्याची मजा लुटली. कार्यक्रमाच्या शेवटी कुमारी कांचन घाग हिच्या नृत्याविष्काराने कार्यक्रमाची अजून शोभा वाढवली. कमी वेळा मध्ये मुलांनी कौतुकास्पद त्यांच्या कला दाखवल्या आणि त्यांना प्रेक्षकांकडून सुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला. मुले गुगल मीट च्या चाट बॉक्स मध्ये आपला अभिप्राय व्यक्त करीत होती आणि त्याची दाखल आम्ही वारंवार घेत होतो.<br>कार्यक्रमाच्या कॉर्डीनेटर डॉ. अनया मार्कंडेय यांनी कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या मॅनेजमेन्ट, प्राचार्यांचे. प्राध्यापक वर्गाचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. आणि सादरकर्त्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अश्या तऱ्हेने कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. |
| **No of Beneficiary -:** | 54 |